Title for website – HSC Online Form filling for 2021.

## महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

### ।।प्र क ट न।।

विषय- सन २०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२ वी) परीक्षेची आवेदनपत्रे ऑनलाईन सादर करावयाच्या तारखांबाबत....

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्यात कोविड-१९ या विषाणूचा प्रादुर्भावामुळे शासनाने लॉकडाऊन/संचारबंदी जाहीर केली होती व वेळोवेळी सदरचा कालावधी वाढवल्यामुळे माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२० परीक्षांचे निकाल माहे जुलै २०२० मध्ये जाहीर झालेले आहेत. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत सन२०२१ मध्ये घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस नियमित, पुनर्परीक्षार्थी, नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Repeater),तसेच श्रेणीसुधार योजने अंतर्गत व तुरळक विषय घेवून प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहेत.

सदर परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांचे परीक्षेचे आवेदनपत्र ऑनलाईन पध्दतीने www.mahahsscboard.in या संकेतस्थळावर भरावयाची असून त्यांच्या तारखा व तपशील खालीलप्रमाणे.

| शुल्क प्रकार | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत शास्त्र, कला व वाणिज्य शाखांची फक्त नियमित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे SARAL Database वरुन ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत व्यवसाय अभ्यासक्रम शाखेचे नियमित विद्यार्थी (Hsc Vocational Stream) पुनर्परीक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Repeater),श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीप्रमाणे ऑनलाईन पध्दतीने भरावयाच्या तारखा | उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी चलन Download करुन चलनाद्वारे बँकेत शुल्क भरावयाच्या तारखा |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| नियमित शुल्कासह | मंगळवार दि.१५/१२/२०२० ते सोमवार दि. ०४/०१/२०२१ | मंगळवार दि. ०५/०१/२०२१ ते सोमवार दि. १८/०१/२०२१ | मंगळवार दि.१५/१२/२०२० ते सोमवार दि.२५/०१/२०२१ |

अ) आवेदनपत्रे भरावयाच्या कालावधीमध्ये उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन सबमीट केल्यानंतर त्यांना कॉलेज Login मधून Pre-list उपलब्ध करुन दिलेली असेल कनिष्ठ महाविद्यालयांनी त्याची प्रिंट काढून विद्यार्थ्यांमार्फत आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती जनरल रजिस्टरच्या माहितीनुसार पडताळून अचूक असल्याची खात्री करावी व त्याबाबत Pre-list वर विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. त्यानंतर सदर Pre-list चलनासोबत विभागीय मंडळात जमा करावी.

ब) उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयांनी विभागीय मंडळाकडे शुल्क भरल्याच्या चलनासह विद्यार्थ्यांच्या याद्या व Pre-list जमा करावयाची तारीख गुरुवार दि.२८/०१/२०२१ राहील.

इ.१२वी परीक्षेची आवेदनपत्रे ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने विद्यार्थ्यांनी आवेदनपत्रे त्यांच्या उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांमार्फत भरावी. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्य यांनी ऑनलाईन आवेदनपत्रे भरण्यासाठी खालील महत्वाच्या बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

१. कोविड-१९ विषाणू प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर शासनाने व विशेषतः आरोग्य विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या सर्व सूचनांचे व नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेण्यात यावी.

२. शासन निर्णय क्र.गव्ह.१५१७/प्र.क्र.१९/संगणक दि.१४/०८/२०१७ नुसार उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी **नियमित विद्यार्थ्यांची विज्ञान, कला व वाणिज्य शाखांची** ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकारण्यासाठी **Saral Database** मध्ये विद्यार्थ्यांची अद्ययावत नोंद असणे आवश्यक आहे. सदर **Saral Data** वरुनच नियामित विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरावयाची आहेत.

३. **व्यवसाय अभ्यासक्रम (HSC Vocational) शाखेच्या नियमित विद्यार्थ्यांची, पुनर्परिक्षार्थी, यापूर्वी नाव नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खाजगी विद्यार्थी (Private Repeater),श्रेणी सुधार व तुरळक विषय घेऊन परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्यांची माहिती Saral Data मध्ये नसल्याने सदर विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे प्रचलित पध्दतीने ऑनलाईनच भरावयाची आहेत. त्याच्या तारखा वरीलप्रमाणे (कॉलम नं.३ नुसार) निश्चित करण्यात आल्या आहेत.**

४. सर्व विभागीय मंडळातील उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी प्रचलित शुल्क मंडळाने निश्चित केलेल्या बँकेच्या खात्यामध्ये जमा करुन चलनाची प्रत व विद्यार्थ्यांच्या याद्या दिलेल्या मुदतीतच संबंधित विभागीय मंडळाकडे सादर कराव्यात.

५. आवेदनपत्रे सादर केलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क चलनाद्वारे भरण्यात यावे.

६. यावर्षी नव्याने फॉर्म नं.१७ दवारे नोंदणी करणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची सन २०२१ मधील परीक्षेची आवेदनपत्रे भरण्याचा कालावधी स्वतंत्रपणे निश्चित केला जाणार असल्याने उपरोक्त कालावधीत या विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरण्यात येवू नयेत.

७. सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी गतवर्षीप्रमाणेच परीक्षा शुल्क संगणकीय चलन Download करुन चलनावरील नमूदप्रमाणे मंडळाच्या Virtual Account मध्ये NEFT/RTGS द्वारे वर्ग करावयाचे आहे. उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांनी NEFT/RTGS द्वारे वर्ग केलेली रक्कम त्यांच्या बँक खात्यातून प्रत्यक्ष वजा झाली आहे किंवा नाही तसेच Account Number व IFSC Code चुकीचा नमूद केला गेल्यास सदरची रक्कम परत त्यांच्या खात्यात जमा झाली नसल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांची राहील.

८. सन २०२१ मधील परीक्षेसाठी फेब्रुवारी-मार्च २०२० अथवा नोव्हेंबर-डिसेंबर २०२० मधील परीक्षेमध्ये एकाच वेळी सर्व विषय घेवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांनाच श्रेणीसुधार योजनेतंर्गत आवेदनपत्र भरुन परीक्षेस प्रविष्ठ होता येणार आहे. त्यामुळे त्यापूर्वीचे असे उत्तीर्ण विद्यार्थी अथवा कोणताही पुनर्परिक्षार्थी विद्यार्थी श्रेणीसुधार योनजेतंर्गत परीक्षेस प्रविष्ठ होणार नाही याबाबतच्या स्पष्ट सूचना विभागीय मंडळ स्तरावरुन सर्व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांना देण्यात याव्यात.

दिनांक : ११/१२ /२०२०.

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे-०४.